दैनिक सामना- 15 ऑक्टोबर,2023

# 'उमवी'त सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

जळगाव : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशालेतील विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध प्रशालांमध्ये जाऊन सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केली. संगणकशास्त्र प्रशाला आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करारान्वये सायबर सुरक्षेबाबत सावध्याने जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात येतात. सध्या सायबर क्राईमच्या घटना वाढल्या आहेत. ऑनलाईन फसवणुकीचे गुन्हे घडत आहेत. या सगळ्यांबाबत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करून कोणती खबरदारी घेतली पाहिजे, याबाबत माहिती देण्यात आली. प्रशालेचे संचालक डॉ. सतीश कोल्हे, समन्वयक प्रा. राजू आमले, प्रा. सुरेन्द्र कापसे, प्रा. मनोज पाटील, ठकन जानगवळी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी आशिष पाटील, राजश्री कापुरे, पायस सावळे, पौर्णिमा चौधरी, कुनिका खैरनार, दर्शना हिरे, वैष्णवी साळुंके, नेहा पवार, लिना भोंडे, संजना अंदुरकर, गौरव चौधरी, गजानन घुले यांनी सायबर सुरक्षितबाबत माहिती दिली.